महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:१४४२/सकअमविप/२०२१/२४ दिनांक : ०७ जून, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२१
गुणांच्या फेरपडताळणी (Retotalling) करीता अर्ज सादर करण्याबाबत

संदर्भ:-(१) जाहिरात क्रमांक - २७१/२०२१
(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ३० व ३१ मे, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२१ या परीक्षेचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील पदांचा अंतिम निकाल दिनांक ३० मे, २०२२ रोजी व मंत्रालयीन विभागातील पदांचा सुधारित अंतिम निकाल दिनांक ३१ मे, २०२२ जाहीर करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या उमेदवारांना त्यांचे गुणपत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' मधील 'View Marksheet' या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील 'Retotalling of Marks' या लिंकवर क्लिक करावे.
(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.
(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.
(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.
(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन 'Save' बटनवर क्लिक करावे.
(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरिताची सदर वेबलिंक दिनांक ०८ जून, २०२२ ते १७ जून, २०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**४.** उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल-फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग